द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ :एमएससीडीए/४७४/ २०२० ३ एप्रिल २०२०

**मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी**
**सर्व झोनल अध्यक्ष / सचिव / सर्व जिल्हा अध्यक्ष / सचिव**
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**विषय : अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या कारवाईविरोधात अपील दाखल करणेबाबत**

महोदय,

आपणास वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आपल्या जिल्ह्यातील परवाने धारकावर जर परवाने प्राधिकृत अधिकारी यांचेकडून परवाने निश्चित कालावधीसाठी निलंबित करणे अथवा परवाने कायमस्वरुपी रद्द करणे अशा कुठलाही प्रकारची कारवाई करण्यात आली असेल व असा परवाने धारक त्या विरुध्द अपील दाखल करु ईच्छित असेल तर त्यांने त्यास मिळालेल्या आदेशाच्या तारखेपासून १५ ते ३० दिवसाचे आत अपील मा. मंत्री महोदय - अन्न व औषध प्रशासन यांचेकडे दाखल करणे यापुढे आवश्यक राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

याअगोदर वेळेवर अपील करण्याची पध्दती आता बंद झाली असून त्वरित अपील दाखल करण्याची पध्दत अवलंबिली जाणार आहे याबाबतची माहिती सर्व सभासदांना कळविण्यात यावी. मा श्री. राजेंद्रजी शिंगणे - मंत्री अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्य पध्दतीस अनुसरुन व प्राप्त सुचनेवरुन आपणास वरील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

सदरहू बाब आपल्या सभासदांच्या दृष्टिने हितावह असून शेवट पर्यंत अपील दाखल करणे व त्यावरील निर्णयाची प्रतिक्षा करणे यासाठी आपणास आता ताटकळत राहावे लागणार नाही. मा. मंत्री महोदयांच्या या निर्णयावर व त्यांच्या कार्यशैलीचे आम्ही मनःपुर्वक स्वागत करतो. आपणाकडून त्वरित कार्यवाहीची अपेक्षा !

कळावे.

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
**सचिव**